REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# 'लोक माझे सांगाती' राजकारणतील अलौकिक कर्तुत्वाचा आलेख

प्रा. सुभाष जयसिंग कदम
मराठी विभाग, कर्मवीर भाउराव पाटील महाविद्यालय, पंढरपुर

मराठी वाङ्ःमयात आत्मचरित्र वाङ्ःमय प्रकार अव्वल इंग्रजी कालखंडापासून_आपल्याकडे रुढ झाला. प्राचीन मराठी वाङ्ःमयात नाना फडणविसांचे आत्मचरित्र ,गंगाधरशास्त्री पटवर्धन यांचे आत्मचरित्र अशी दोन गद्य आत्मचरित्र दिसतात .संत साहित्यातही नामदेव, तुकाराम,बहिणाबाई इत्यादी संतांच्या काळात स्व विषयीची माहिती आल्याचे दिसते. असे असले तरी आत्मचरित्र लिहिणे ही संतांची भूमिका दिसत नाही. गंगाधरशास्त्री पटवर्धन आपल्या आत्मचरित्रात प्रारंभी "स्मरणात जो सत्य व्यवहार आहे तो लिहून देतो" असे म्हणतात. यावरुन आत्मचरित्र लिहिणे ही त्यांची भूमिका नव्हती. जो भाग आज त्यांना आठवतो पण खरा आहे, तोच मी सांगतो असे ते म्हणतात. "स्वजीवन तटस्थपणे न्याहाळुन त्यातुन आवश्यक बाबींची निवड करुन त्यांचे प्रांजळ निवेदन व कलात्मक मांडणी यातून 'स्व' चे चित्र रेखाटणे म्हणजे आत्मचरित्र होय."[3]अशी आत्मचरित्राची व्याख्या विमल भालेराव यांनी केली आहे. तर डॉ. सदा क-हाडे यांनी "स्वतःच्या जीवनाचे दुरस्थपणाने सिंहवलोकन वृत्तीने केलेले अवलोकन आणि त्याविषयीचे प्रांजल निवेदन म्हणजे आत्मचरित्र" मराठीत आत्मचरित्र हा प्रकार इंग्रजीसाहित्याच्या वाचनातूनच निर्माण झाला.

आत्मचरित्रातूनच आत्मकथनाकडे हा मार्गप्रवास मात्र मराठी साहित्यात झालेला आपणास दिसतो. डॉ जयंत मनोहर यांनी 'दलित स्वकथने' या लेखात 'स्वकथन' ही संज्ञा दलित आत्मपर लिखाणाला प्रथमच योजलेले आढळते. अलिकडे आत्मचरित्र ही संकल्पना आत्मकथन, आत्मकथा, आत्मनिवेदन, स्वकथन अशा विविध संज्ञानी आढळते आत्मचरित्र या संकल्पनेच्या विविध व्याख्या आभ्यासकांनी केल्या आहेत.

दोन्ही व्याख्यांमधून स्वतःविषयीची माहिती, प्रांजळ निवेदन, तटस्थपणा यांना महत्व असल्याचे दिसते. या बरोबरच सत्यान्वेषी भूमिकेतून लेखन केले पाहिजे हे महत्वाचे आहे. या सा-या व्याख्यांचा परामर्ष घेऊन आत्मकथा याविषयी असे म्हणता येईल की "कोणताही आडपडदा न ठेवता आपल्या जिवनाचा घटनाक्रम जसाच्या तसा शब्दरुपात मांडणे म्हणजे आत्मकथा ." मराठीत आत्मचरित्र ही मोठ्या प्रमाणात लिहिली गेली आहेत. पुरुषांच्या बरोबरीने स्त्री आत्मचरित्रांची संख्या आहे .



रमाबाई रानडे, पार्वतीबाई आठवले. लक्ष्मीबाई टिळक यांच्याबरोबरच मेहरुनिसा दलवाई, कमलाबाई देशपांडे, हंसा वाडकर, माधवी देसाई, सुभा करंदीकर अशा अनेक स्त्रीयांनी आत्मचरित्र लिहिली आहेत. आत्मचरित्र व आत्मकथन यातील फरक स्पष्ट करताना डॉ. सदा क-हाडे म्हणतात "आत्मचरित्र इतिहासाच्या अंगाने लिहिले जाते, तर आत्मकथन कथेच्या अंगाने लिहिले जाते. कालानुक्रमाने लिहिलेल्या आत्मचरित्रात सलगपणा येतो, तर आत्मकथनात घटना, प्रसंग सांगत असतांना कालनुक्रमाने उल्लंघन होते.'' क-हाडेंच्या मते, आत्मचरित्रात सलगपणा आलेला असतो तर आत्मकथनात प्रसंग पुढे मागे झालेले दिसतात.

दलित आत्मकथनातील मराठी साहित्यात स्वतःचे स्थान निर्माण केले. दया पवार, शंकरराव खरात, लक्ष्मण माने, उर्मिला पवार अशा अनेक लेखकांनी आत्मकथनाचा प्रांत समृद्ध केला आणि मराठीत आत्मकथनांची मोठी परंपरा सुरु झाली. राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण, सिनेमा, खेळ असे कोणतेही क्षेत्र बाजूला राहीले नाही प्रत्येक क्षेत्रात काम करणा-या व्यक्तीने आपल्या जीवनाच्या वाटाचालीतील भलेबुरे अनुभव शब्दबद्ध केले. आपल्या शब्दातून आपल्याच पूर्व जीवनाचा आलेख मांडतांना आपण काम करत असलेल्या क्षेत्रातील खाचखळगे निदर्शनास आणून दिले. समाजाला अनभिज्ञ असणा-या अनेक गोष्टींची मांडणी करुन समाजातील परंपरागत समाजाला धक्के दिले. लोकांना यशस्वी झालेल्या लोकांची कहाणी त्यांच्याच शब्दात वाचता यायला लागली.

महाराष्ट्रात नव्हे तर भारत देशाच्या राजकारणातील एक प्रेरणादायी, यशस्वी व सर्वपरिचीत असा चेहरा म्हणजेच शरद पवारसाहेब होत. दिल्लीच्या राजकारणात महाराष्ट्राचा ठसा ताकतीने व शक्तीने उमटवणारे नेते म्हणून त्यांची ओळख आहे. चार वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद व तीन वेळा केंद्रीय मंत्रीपद त्यांनी भूषवलं आहे. राजकारण, समाजकारण अर्थकारण ,क्रीडा, विज्ञान, कृषी, शिक्षण साहित्य ,तत्वज्ञान या सर्वांची जाण असणारे व या सर्वात यशस्वी ठरलेले नेते म्हणून त्यांची वेगळी ओळख आहे.

शरद पवार यांच्या राजकीय जीवनाची ही आत्मकथा राजहंस प्रकाशनाने डिसेंबर 2015 रोजी प्रकाशित केली. त्याची सहावी आवृत्ती फ्रेब्रुवारी 2016 रोजी निघाली. यावरुन या आत्मकथनाची लोकप्रियता लक्षात येते. अर्पण पत्रात काश्मीरपासून कन्याकुमारी पर्यंतच्या प्रत्येक भारतीयास विनम्र सादर असे म्हटले आहे. यावरुन त्याचा आवाका लक्षात येतो. प्रत्येक भारतीयाला अर्पण असाच याचा अर्थ आहे. पवार साहेबांनी आपल्या राजकीय जीवनाचा आलेख यातून मांडला आहे.

एकुण नऊ प्रकरणातून या आत्मकथनाची मांडणी करताना त्यांनी प्रत्येक प्रकरणात आणखी उपप्रकरणांची मांडणी केलेली दिसते. दुस-या आणि तिस-या प्रकरणात प्रत्येकी नऊ उपप्रकरणे आहेत. सुर सापडला या प्रकरणापासून म्हणजे 1960 नंतर ते पूर्ण वेळ राजकारणात सक्रिय झाल्याचे पहायला मिळते.प्रत्येक उपप्रकरणात त्यांनी आपल्या जीवनातील एका टप्प्याचे वर्णन केले आहे पहिल्या दोन प्रकरणातून शालेय जीवनातच पवारांचे नेतृत्वगूण उठून दिसत होते. हे त्यांच्या स्पष्ट होते .

**सक्रीय राजकारणात काम करणारे व आपल्या कार्याचा ठसा सर्वच क्षेत्रात उमटवणारे पवारसाहेब नेहमीच कुतूहलाचा विषय राहिले आहेत. राजकारणातील त्यांच्या या प्रदीर्घ राजकीय वाटचालीचा इतिहास 'लोक माझे सांगाती' या आत्मकथेत त्यांनी मांडला आहे. पन्नास वर्षांपेक्षा अधिक वर्षांची. 'लोक माझे सांगाती' हे शरद पवारसाहेब यांचे आत्मकथन हे लोकांना या अवलियाची राजकीय कारकिर्द दर्शिविणारे आत्मकथन आहे**

**दुस-या प्रकरणात त्यांनी मंत्रीपदाची घेतलेली पहिल्यांदा शपथ ते त्यांनी केलेले कॉंग्रेस विरोधी बंड 'पुलोद' सरकार स्थापून मुख्यमंत्री ते इंदिरा गाधींचा खून, राजीव गांधीचा राजकारणात प्रवेश ते शरद पवारांना पुन्हा कांग्रेसवासी व्हायला लावण्या पर्यंतचा (राजीव गांधीनी) प्रवास आला आहे. यासाठी नऊ उपप्रकरणे त्यांनी खर्ची घातली आहेत.**

**तिस-या प्रकरणातही नऊ उपप्रकरणातून शरद पवारांचे कॉंग्रेस मधून पुन्हा महिला धोरणे, कॉंग्रेसमधील वाद मुख्यमंत्रीपदी विराजमान होणे, 'एन्रान' आयोध्या प्रकरण, असे भाग आले आहेत. पवारांचा कॉंग्रेसमध्ये झालेला पुन्हा प्रवेश ते त्यांना कॉंग्रेस मधून निलंबित करण्यापर्यंतचा भाग आला आहे. यामध्ये त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी घेतलेल्या कणखर भूमिकांची मांडणी यामध्ये केली आहे. महाराष्ट्राबरोबरच दिल्लीत मंत्री म्हणून केलेले काम व त्याबरोबरच देशपातळीवर, आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांचं काम किती मोठं होतं याच दर्शन त्यांच्या निवेदनातून घडते.**

**चौथ्या प्रकरणातील दोन उपप्रकरणातून लोकांच्या मनात असणा-या अनेक कुतूहलांना त्यानी निवेदनातून उत्तर दिलेले आहे. दिल्लीत घडलेल्या घाडामोडी, त्यातून त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची केलेली स्थापना या विषयी माहिती देताना पाचव्या प्रकरणातील तीन उपप्रकरणातून त्यांनी सरकारमधील इतर मंत्र्याच्या कारभाराची मांडणी करुन देशाचे कृषीमंत्री म्हणुन भारतीय शेती ,शेतकरी यांच्या समस्या सोडविण्यासाठी कसे प्राधान्य क्रम देऊन काम केले या विषयी माहिती दिली आहे.**

**प्रकरण सहा या मधून त्यांनी कर्करोगासारख्या आजाराशी दोन हात कसे केले? त्याचबरोबर 'संपुआ' सरकारची कामगिरी त्यावेळी लोकांनी केलेली मदत, व कब्बडी, क्रिकेट अशा कितीतरी खेळाविषयी त्यांनी केलेले कार्य अनमोल आहे. राजकारणा पलिकडे पवारसाहेबांनी केलेली कामगिरी त्यांनी सांगितली आहे.**

**सात, आठ, नऊ ही प्रकरने त्यांच्या आत्मकथणाचा समारोप आहे. सातव्या प्रकरणात व्यक्ती आणि प्रकृती या त्यांच्या जीवनात पाहिलेली, त्यांचे स्वभाव, अनूभवलेली सहवासाने शिकता आलेली माणसे, त्यांचे कार्य उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. बारामतीची यशोगाथा या प्रकरणात बारामतीच्या प्रगतीचा आलेख उलघडला आहे. नवव्या प्रकरणात येत्या काळात डोकावताना ते या पुढील काळातील समस्यांची मांडणी करतात.**

**नऊ प्रकरणातून असणारे राजकीय जीवन पवारसाहेब आपल्या शब्दात सांगतात. पन्नास वर्षांपेक्षा अधिकचा काळ सांगतांना त्यांनी घटनाक्रम मागेपुढे केला आसला तरी प्रसंग कितीही मोठा असला तरी तो मोजक्या शब्दात व वाचकाला समजेल अशा भाषेत ते व्यक्त करतात. त्या घटानाप्रसंगाना थोडक्या शब्दात मांडण्याचे त्यांचे कौशल्य अनेक ठिकाणी दिसते.**

**संदर्भ -**

1. ‘लोक माझे सांगाती’, शरद पवार , राजहंस प्रकाशन,२०१६
2. चरित्र, आत्मचरित्र - डॉ.सदा.क-हाडे
3. प्राचीन मराठी वाङःमयाचा इतिहास -ल. रा. लसिराबादकर
4. आधुनिक मराठी वाङःमयातील स्त्रीयांची आत्मकथने -विमल भालेराव